**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २९३ । शनिवार २२ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

## कोपरगावातून पळवून आणलेल्या अल्पवयीन मुलीची एलसीबीकडून सुटका

### दरेवाडी परिसरातून दोन आरोपी ताब्यात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोपरगाव शहरातून पळवून आणलेल्या एका १२ वर्षीय मुलीची स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या तीन दिवसांत यशस्वी सुटका केली आहे. या कारवाईत पोलिसांनी दरेवाडी (ता. नगर) येथून दोन आरोपींना ताब्यात घेतले असून, पीडित मुलीसह पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्यांना कोपरगाव शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी कोपरगाव येथील १२ वर्षीय अल्पवयीन मुलीस अज्ञात इसमाने पळवून नेले होते. याप्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विशेष तपास पथक तयार केले.

तपास पथक आरोपी व पीडितेचा शोध घेत असताना, २१ ऑगस्ट रोजी गोपनीय बातमी मिळाली ■ पान ४ वर

## उद्योजक जिल्ह्यात निर्भयपणे गुंतवणूक करून रोजगार निर्माण करतील - ना. राधाकृष्ण विखे पाटील

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यात ७८ उद्योजकांनी सुमारे १३ हजार कोटी रुपयांची केलेली गुंतवणूक औद्योगिक क्षेत्राला नवा आत्मविश्वास देणारी आहे.औद्यगिक विकासाच्या दृष्टीने निर्माण झालेल्या सकारात्मक वातावरणामुळे उद्योजक जिल्ह्यात निर्भयपणे गुंतवणूक करून रोजगार निर्माण करतील असा विश्वास जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

शासनाच्या उद्योग विभागाच्या वतीने गुंतवणूक परीषदेचे आयोजन करण्यात आले होते. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत जिल्ह्यात ७८ उद्योगांशी उद्योग विभागाच्या माध्यमातून करार करण्यात आले.सुमारे १३हजार कोटी रुपयांची गुंतवणूक यामाध्यातून झाली आहे.सर्व उद्योजकांचा सन्मान मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

गुंतवणूक परिषदेस आ.काशिनाथ दाते उद्योग विभागाच्या सहआयुक्त वृषाली सोने,उद्योजक अरविंद पारगावकर,औद्योगिक विकास मंडळाचे क्षेत्रीय अधिकारी गणेश राठोड जिल्हा उद्योग अधिकारी अशोक बेनके,भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग शहराचे अध्यक्ष अनिल मोहिते विनायक देशमुख अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.

याप्रसंगी उद्योजकांशी संवाद साधतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की, अहील्यानगर जिल्हा मुख्य औद्यगिक केंद्र म्हणून पुढे येत आहे.यापुर्वी औद्योगिक विकासात थोडे नकारात्मक वातावरण होते.मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात येत असलेल्या गुंतवणूकीचा लाभ जिल्ह्याला होत असल्याने औद्योगिक क्षेत्रात सकारत्मक वातावरण निर्माण होत असल्याचे समाधान व्यक्त केले.

जिल्ह्यात औद्योगिक विकासासाठी जागांची उपलब्धता करून दिल्यानंतर पहीला संरक्षण प्रकल्प निबे गृपच्या माध्यमातून जिल्ह्यात भविष्यात बेलवंडी, हरेगाव येथेही संरक्षण उत्पादनाचे प्रकल्प कार्वान्वित होणार असल्याचे सांगून,यापुर्वी असे प्रयत्न जिल्ह्यात झाले नाहीत त्यामुळे औद्योगिक विकासात जिल्हा मागे राहीला. धाक दडपशाही मुळे उद्योग माघारी गेल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

उद्योजकांना सुरक्षा वाटेल,त्यांना पायाभूत सुविधा कामागारांना संरक्षण मिळेल असे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी उद्योग विभागाला घ्यावी लागेल असे सुचित करून मंत्री विखे पाटील म्हणाले की, सूक्ष्म आणि लघु उद्योगापासून ते मोठ्या उद्योगांच्या गुंतवणूकीसाठी युवक महीला पुढे येत असल्याचे समाधान असून,यातून नवा आत्मविश्वास औद्योगिक क्षेत्राला मिळेल.गुंतवणूक किती कोटीची यापेक्षाही तरूण उद्योजकांच्या धाडसाला महत्व आहे.

अहील्यानगर जिल्हा छत्रपती संभाजी नगर आणि पुणे या मोठ्या औद्यगिक पट्ट्याला ■ पान ४ वर

## राहुल गांधींकडून राजकीय फायद्यासाठी विद्यार्थी आंदोलनाचा वापर – राधाकृष्ण विखे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पुणे येथे आज, शनिवारी आयोजित 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमावरून राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. राहुल गांधी हे राजकीय फायद्यासाठी विद्यार्थी आंदोलनाचा वापर करत असून, लोकसभेत सलग तीन वेळा झालेला पराभव आणि ढासळलेली प्रतिमा सुधारण्यासाठीच हे उपक्रम राबवत असल्याचा आरोप विखे पाटील यांनी केला.

विखे पाटील म्हणाले की, मागे जेव्हा काँग्रेस–राष्ट्रवादीचे सरकार आले होते, तेव्हा हे लोक झोपले होते का? आत्ताच यांना अशा गोष्टी का सुचतात? तसेच आंदोलनात पैसे देऊन विद्यार्थ्यांना बोलवण्यात आल्याची ■ पान ४ वर

### पत्रकार सुशील थोरात यांची रुग्णालयात जाऊन विचारपूस

येथील पत्रकार सुशिल थोरात यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ला प्रकरणाची गंभीर दखल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतली आहे. विखेंनी रुग्णालयात जाऊन थोरात यांची विचारपूस केली. तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्या दोषींवर मोक्का अंतर्गत कडक कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा विखे पाटील यांनी दिला आहे. पत्रकारांवर हल्ला होणे ही गंभीर बाब असून, अशा प्रकारची गुंडगिरी सहन केली जाणार नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

## सारोळे पठार शिवारात जुगार अड्ड्यावर छापा

### घारगाव पोलिसांची कारवाई । दोन लाखांच्या मुद्देमालासह पाच जुगारी ताब्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संगमनेर तालुक्यातील सारोळे पठार शिवारात बबन मुरलीधर फटांगरे यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर घारगाव पोलिसांनी धाड टाकून रोख रकमेसह एकूण २ लाख ५ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. या कारवाईत पाच जुगाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

दिनांक २१ ऑगस्ट रोजी घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांना गुप्त बातमीदारामार्फत ■ पान ४ वर



## घरगुती वादातून तरुणाला जीवे मारण्याचा प्रयत्न; सहा आरोपी अटकेत

### बेलवंडी पोलिसांची कारवाई; दोन अनोळखी आरोपींचा शोध सुरू




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** वडिलोपार्जित घराच्या जुन्या वादातून तरुणाला काठ्या व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी बेलवंडी पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपींना ताब्यात घेतले. आणखी दोन अनोळखी आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय प्रभाकर जाधव (वय २५, रा. येवती, ता. श्रीगोंदा) हे दि. २ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास ढवळगाव फाटा येथील आपल्या भाजीपाला दुकानात होते. यावेळी वडिलोपार्जित घराच्या जुन्या वादातून त्यांचा चुलत भाऊ आणि त्याच्या साथीदारांनी हातात काठ्या व टिकावाचे दांडके घेऊन अक्षय जाधव यांना लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात जाधव गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात गु.र.नं. २९५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), १८९(२), १९१(२)(३), १९०, ३५२, ३५१(२)(३) सह वाढीव कलम १०९(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षिरसागर यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाबाबत आवश्यक सूचना दिल्या. दरम्यान, ■ पान ४ वर

कोणत्याही प्रकारचे कर्ज आता त्वरीत मिळवा!
गरजेला नक्कीच मदत आमची, उभे राहण्याची हिंमत तुमची !
राघव लोन सर्व्हिसेस
सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा
▪ जलद मंजुरी ▪ कमी व्याजदर ▪ सुलभ हफ्ते
व्यावसायिक कर्ज 75 लाखांपर्यंत (विनातारण)
जुन्या जेसीबी,ट्रॅक्टर, हायवा,कार, इ. साठीही कर्ज पुरवठा



विनातारण कर्ज
▸ व्यवसायीक व पगारदारांसाठी खास सी.सी / ओ.डी सुविधा
▸ डॉक्टर लोन
▸ आकर्षक व्याजदर



तारण कर्ज
▸ घर,एन.ए प्लॉट,व्यवसायिक मालमत्ता यासाठी कर्ज सुविधा
▸ आर.झोन,गुंठेवारी,ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता यावरही त्वरीत कर्ज



वाहन कर्ज
▸ नविन व जुन्या कारसाठी कमीत कमी व्याजदरात त्वरीत कर्ज
▸ व्यावसायिक वाहनांसाठी शासकीय अनुदान

विनातारण व्यावसायिक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : ▸ पॅन कार्ड ▸ आधार कार्ड ▸ शॉप ॲक्ट ▸ उद्यम आधार ▸ मागील तीन वर्षांचे आयटीआर ▸ बँक अकाऊंट स्टेटमेंट (पीडीएफ मध्ये) ▸ जीएसटी सर्टिफिकेट ▸ लाईट बिल ▸ फोटो

सर्व प्रकारच्या व्यवसायासाठी शासकीय कर्ज योजनांचे ऑनलाईन फॉर्म भरुन मिळतील तसेच कर्जासाठी योग्य मार्गदर्शन केले जाईल
अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ | मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम | ओ.बी.सी. महामंडळ योजना
(टीप - या योजनांसाठी सेवाशुल्क आकारले जाईल)
नियम व अटी लागू
700+ सिबिल स्कोअर 700+ असल्यास प्राधान्य
कोणतेही चालू कर्ज थकीत नसावे
आम्ही संपुर्ण महाराष्ट्रात कर्ज सेवा देतो
नामांकीत बँका व एनबीएफसी चे अर्थसहाय्य उपलब्ध !
अधिक माहितीसाठी संपर्क : 9960283285
पत्ता : शॉप नंबर 29,स्टेट बँके समोर,सुरजनगर,शिरुर,ता.शिरुर

# खा. लंके यांच्या मध्यस्थीने पठारेंचे उपोषण मागे

## पारनेरच्या पाणी योजनेला आता मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाची प्रतीक्षा । नगरपंचायतीच्या लेखी आश्वासनानंतर चार दिवसांच्या आंदोलनाची सांगता । तोडगा न निघाल्यास मुंबईत आंदोलनाचा खासदार लंके यांचा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर शहराला कायमस्वरूपी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी मुळा धरणाच्या बॅकवॉटरमधून प्रस्तावित करण्यात आलेली पाणीपुरवठा योजना तातडीने मंजूर करून प्रत्यक्ष काम सुरू करावे, या मागणीसाठी आमरण उपोषण करणारे मार्तंडनाना पठारे विचार मंचाचे अध्यक्ष दीपक पठारे यांनी चार दिवसांनंतर शुक्रवारी (ता. २१) उपोषण मागे घेतले. खासदार नीलेश लंके यांनी उपोषणस्थळी भेट देऊन मध्यस्थी केल्यानंतर आणि पारनेर नगरपंचायतीच्या वतीने लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनाची सांगता झाली. नगरपंचायतीचे हे लेखी आश्वासन खासदार लंके यांच्या हस्ते पठारे यांना देण्यात आले.



पाणी योजनेच्या मंजुरीसाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असून, फाइल कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे, याची माहिती दोन दिवसांत देण्यात येईल, असे नगरपंचायतीने पत्राद्वारे स्पष्ट केले आहे. त्यामुळे चार दिवसांच्या उपोषणानंतर आंदोलनाला तूर्त विराम मिळाला असला तरी पाणी योजनेच्या प्रत्यक्ष मंजुरीकडे आता पारनेरकरांचे लक्ष लागले आहे.

पारनेर शहरासाठी मुळा धरणाच्या बॅकवॉटरमधून पाणी आणून कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्याची योजना प्रस्तावित आहे. या योजनेसाठी सर्वेक्षण करण्यात आले असून, तांत्रिक मंजुरीसाठी ७२ लाख ८७ हजार २७७ रुपये शासनाच्या कोषागारात जमा करण्यात आले आहेत. मात्र, दोन वर्षांपासून प्रस्ताव पुढील मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याने योजनेचे प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही. खासदार नीलेश लंके यांनी सांगितले की, पारनेर शहराची पाणी योजना हा पारनेरकरांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. शाश्वत पाणीपुरवठ्यासाठी पाणीपुरवठा समितीचे सभापती योगेश मते तसेच नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी सर्वेक्षण करून आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली आहे. तांत्रिक मंजुरीसाठी मोठी रक्कम शासनाच्या कोषागारात जमा करूनही योजना दोन वर्षांपासून प्रलंबित आहे.

पारनेरच्या पाणी योजनेसोबत राज्यातील इतर पाणी योजनांना मंजुरी मिळाली असताना पारनेर शहराची योजना मात्र प्रलंबित ठेवण्यात आल्याचा आरोप लंके यांनी केला. राजकीय कुरघोडीतून ही योजना रखडल्याचे त्यांनी म्हटले.पारनेरकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा राजकारणाचा विषय होऊ नये. शहराला शाश्वत पाणी मिळण्यासाठी ही योजना तातडीने मार्गी लागणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत,असे लंके यांनी स्पष्ट केले.

रखडलेल्या पाणी योजनेचा विषय राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे लंके यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पारनेर नगरपंचायतीचे पदाधिकारी आणि उपोषणकर्ते यांची संयुक्त बैठक घेण्याबाबत शरद पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.या बैठकीत पाणी योजनेच्या मंजुरीतील अडथळे दूर करून निधी उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीतही योग्य तोडगा निघाला नाही, तर पारनेरच्या पाणी योजनेसाठी मुंबईत आंदोलन करण्यात येईल, असा इशारा लंके यांनी दिला.

पारनेर नगरपंचायतीने दीपक पठारे यांना दिलेल्या पत्रात पाणीपुरवठा योजनेच्या मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आल्याचे नमूद केले आहे. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या कार्यालयाकडून योजनेबाबत आवश्यक माहिती व कागदपत्रे मागविण्यात आली आहेत. त्यानुसार नगरपंचायतीने सविस्तर प्रकल्प अहवाल, तांत्रिक मंजुरी, पाणी आरक्षणासंबंधी कागदपत्रे आणि इतर आवश्यक अभिलेख शासनाकडे सादर केल्याचे पत्रात स्पष्ट केले आहे. योजनेबाबत शासनस्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू असून लवकरच सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा नगरपंचायतीने व्यक्त केली आहे. तसेच पाणीपुरवठा योजना मंजुरीची फाइल कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे, याबाबत दोन दिवसांत माहिती देण्यात येईल, असेही नगरपंचायतीने लेखी आश्वासन दिले आहे.

यावेळी नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर, चंद्रकांत कावरे, रा. या. औटी, नीलेश खोडदे, डॉ. बाळासाहेब कावरे, योगेश मते, उपनगराध्यक्षा प्रियांका शिंदे, अर्जुन भालेकर, दीपक नाईक, प्रकाश दरेकर, दीपक पठारे, भूषण शेलार, रुपेश ढवण, सतीश म्हस्के, बाळासाहेब शेटे, भाऊसाहेब पठारे, आनंद औटी, बाळासाहेब शेरकर, रायभान औटी, डॉ. सचिन औटी, सहदेव तराळ आदी उपस्थित होते.

# श्री विशाल गणेश मंदिर व ज्ञानदा प्रतिष्ठानच्या रक्तदान शिबीरास प्रतिसाद

## मदतीची भावना हीच खरी ईश्वर सेवा– महंत संगमनाथ महाराज



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आपल्या संतांनी धार्मिकतेबरोबरच निसर्ग रक्षणाचाही संदेश आपल्या किर्तन प्रवचनातून दिला आहे. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे', 'कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी' अशा अभंगातून सामाजिकतेची जाणिव करुन दिली आहे. प्रत्येकाने आपल्याकडे जादा असेल ते इतरांना दिले पाहिजे. त्यातून समाजातील समतोल साधण्यास मदत होत असते.आज रक्तदान शिबीराच्या माध्यमातून ज्ञानदा प्रतिष्ठानने स्त्युत्य उपक्रम राबविला आहे. रक्ताची आवश्यकता लक्षात घेता प्रत्येकाने रक्तदान केले पाहिजे, त्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. मदतीची भावना म्हणजे खरी ईश्वर सेवा आहे, असे प्रतिपादन श्री विशाल गणेश मंदिराचे महंत योगी संगमनाथ महाराज यांनी केले.

शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर व ज्ञानदा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबीराचे उद्घाटन महंत योगी संगमनाथ महाराज यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी देवस्थानचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे ,सचिव अशोकराव कानडे ,प्रा माणिकराव विधाते , नितीन पुंड ,ज्ञानदा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सचिन हिरवे, रेणुका पुंड,अमोल जाधव ,शेखर पुंड ,किरण रडे ,प्रशांत गायकवाड ,सुरेंद्र मालवे ,मछिंद्र फुलसदर,मयुरी गोरे आदि उपस्थित होते.

# ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. २ मधून माळेगाव ने मधील बंधाऱ्यात पाणी सोडण्याची मागणी

## अन्यथा २४ ऑगस्टला कार्यालयास 'घेराव आंदोलन'चा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**शेवगाव–** ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र.२ मधून माळेगाव ने परिसरातील विविध बंधाऱ्यांमध्ये तातडीने पाणी सोडण्यात यावे, या मागणीसाठी ॲड.शिवाजीराव काकडे व परिसरातील शेतकरी आक्रमक झाले असून, मागणीची पूर्तता न झाल्यास २४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता शेवगाव येथील ताजनापूर मध्यम प्रकल्प उपविभागीय कार्यालयाला घेराव घालण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

याबाबत ॲड. शिवाजीराव काकडे व जगन्नाथ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीहरी कुलकर्णी उपविभागीय अधिकारी, ताजनापूर मध्यम प्रकल्प उपविभाग, शेवगाव यांना निवेदन दिले आहे. या निवेदनाच्या प्रती अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग अहिल्यानगर यांना ईमेलद्वारे पाठविण्यात आल्या आहेत.

ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. २ मध्ये शेवगाव तालुक्यातील १८ गावांचा समावेश व्हावा, यासाठी माळेगाव ने परिसरातील शेतकऱ्यांनी शेळ्या, मेंढ्या व जनावरांसह आंदोलनात सहभागी होत आपल्या मागणीकडे प्रशासनाचे लक्ष वेधले होते. तथापि आजमितीला माळेगाव ने परिसरातील विविध बंधारे ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. २ मधून भरून देण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. मात्र, इलेक्ट्रिक व मेकॅनिकल विभागाच्या अडचणींचे कारण देत इलेक्ट्रिक पॅनल बॉक्स व इलेक्ट्रिक मोटारी दुरुस्तीचे काम अद्याप बाकी असल्याचे सांगण्यात येत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

दरम्यान, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही मागणीची पूर्तता झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे सांगण्यात आले.

**पावसाने दडी मारल्याने पिके संकटात**

सध्या पावसाने दडी मारल्यामुळे परिसरातील शेतीपिके पाण्याअभावी जळून जाण्याच्या स्थितीत आहेत. या भागात शेतीला जोडधंदा म्हणून मोठ्या प्रमाणात दुग्ध व्यवसाय केला जात असून, पाण्याअभावी त्यावरही परिणाम होत आहे. जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासनाकडे वारंवार विनंती करूनही मागणीची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत, ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र. २ मधून माळेगाव ने परिसरातील विविध बंधाऱ्यांमध्ये तातडीने पाणी सोडण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या मागणीची पूर्तता न झाल्यास २४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता शेवगाव येथील ताजनापूर मध्यम प्रकल्प उपविभागीय कार्यालयाला घेराव आंदोलन करण्यात येईल, तसेच प्रश्न सुटेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर पंढरीनाथ सुडके, पोपट देशमुख, प्रकाश देशमुख, अजिनाथ सुडके, पंढरीनाथ घनवट, नारायण निजवे यांच्यासह शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

# अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सेवानिवृत्त सभासद व गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सेवानिवृत्त सभासद तसेच गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात आली. तसेच सेवानिवृत्त सभासदांचा सन्मान करण्यात आला. मनपा फायर ब्रिगेड विभाग प्रमुख शंकर मिसाळ यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल, व्हाईस चेअरमन कैलास चावरे, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक सतीश ताठे, विकास गीते, शेखर देशपांडे, बलराज गायकवाड, विजय कोतकर, किशोर कानडे, गुलाब गाडे, सोमनाथ सोनवणे, बाळासाहेब गंगेकर, बाळासाहेब पवार, संचालिका प्रमिलाताई पवार, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना चेअरमन बाबासाहेब मुदगल म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिकेचे कर्मचारी आपल्या माध्यमातून नगरकरांना विविध सेवा–सुविधा पुरविण्याचे काम करत असून, आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. धकाधकीच्या जीवनात अनेकदा सभासदांचे आपल्या कुटुंबाकडे आणि विशेषतः पाल्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. मात्र सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे प्रत्येक सभासदाने आपल्या पाल्याच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

सभासद आणि पतसंस्थेमध्ये अतूट नाते असून, या संस्थेला १०० वर्षांची गौरवशाली परंपरा लाभली आहे. दरवर्षी पतसंस्थेच्या माध्यमातून सेवानिवृत्त सभासद तसेच गुणवंत पाल्यांचा गुणगौरव करण्यात येतो. दहावी व बारावीमध्ये प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख स्वरूपाचे पारितोषिक देऊन त्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक केले जाते. या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन आणि प्रेरणा देण्याचे काम पतसंस्था करत आहे, असे त्यांनी सांगितले.

महापालिका कर्मचाऱ्यांची मुले आज विविध क्षेत्रांमध्ये चांगली कामगिरी करत आहेत. सभासद किशोर कानडे यांच्या मुलाने अमेरिकेत शिक्षण घेऊन तेथे नोकरी करत असून, त्यांच्या दुसऱ्या मुलानेही उच्च शिक्षण घेतले आहे. त्यांच्या या यशाबद्दल यावेळी गुणगौरव करण्यात आला. पाल्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या कुटुंबाचे तसेच समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन बाबासाहेब मुदगल यांनी केले.

व्हाईस चेअरमन कैलास चावरे म्हणाले की, महानगरपालिकेतील सेवानिवृत्त सभासद कर्मचारी तसेच त्यांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा मिळतात. त्यांच्या यशाचे कौतुक झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नवीन ऊर्जा व प्रेरणा निर्माण होते. पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांच्या कुटुंबीयांशी असलेले नाते अधिक दृढ करण्याचे काम केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी गुणवंत पाल्यांचा तसेच सेवानिवृत्त सभासदांचा सन्मान करण्यात आला. मनपा फायर ब्रिगेड विभाग प्रमुख शंकर मिसाळ यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक किशोर कानडे यांनी केले. सूत्रसंचालन आनंद तिवारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन विकास गीते यांनी मानले. कार्यक्रमास पतसंस्थेचे पदाधिकारी, संचालक, सभासद, सेवानिवृत्त कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २४ हजार लिटर रॉकेल पैठणमध्ये पडून; जिल्ह्यासाठी आले होते १४४ केएल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** इंधनाच्या वाढत्या दरामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी शासनाकडून रॉकेलचा पुरवठा करण्यात येतो. मात्र पैठण येथे तब्बल २४ हजार लिटर रॉकेल पडून असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. जिल्ह्यासाठी आलेल्या १४४ केएल रॉकेलपैकी पैठण तालुक्याच्या वाट्याला आलेले रॉकेल लाभार्थ्यांपर्यंत पोहोचले नसल्याने पुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शासनाच्या नियमानुसार रेशनकार्डधारकांना निर्धारित दराने रॉकेलचे वितरण करण्यात येते. मात्र पैठण तालुक्यात रॉकेल घेण्यासाठी ग्राहक उपलब्ध नसल्याने मोठ्या प्रमाणात साठा पडून असल्याचे सांगण्यात येत आहे. अर्धा घाऊक रॉकेल विक्रेते आणि रेशन दुकानदार यांच्यामार्फत वितरणाची प्रक्रिया राबविणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात रॉकेलचा साठा पडून राहिल्याचे चित्र आहे.

दरम्यान, रॉकेल वितरणाबाबत संबंधित यंत्रणेकडून स्पष्ट निर्णय घेणे अपेक्षित असताना विलंब होत असल्याने हा साठा नेमका किती दिवस पडून राहणार, असा सवाल उपस्थित होत आहे. शासनाच्या निर्देशानुसार उपलब्ध रॉकेलचा योग्य वापर करून तो पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.
रॉकेलचा साठा पडून असताना त्याच्या वितरणाबाबत प्रशासनाकडून कोणती कार्यवाही केली जाते, याकडे पैठणकरांचे लक्ष लागले आहे.

## दै. आकर्षण निवडक

### भाजपच्या भटके-विमुक्त प्रकोष्ठाच्या राज्य समितीवर तुषार पोटे


अहिल्यानगर - भारतीय जनता पार्टीच्या भटके-विमुक्त प्रकोष्ठाच्या राज्य समितीवर सहसंयोजकपदी अहिल्यानगरचे तुषार पोटे यांची निवड करण्यात आली आहे. राज्य समितीच्या अध्यक्षा नरेंद्र पवार यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून पोटे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.तुषार पोटे गेल्या २५ वर्षांपासून भारतीय जनता पार्टीचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून कार्यरत आहेत. पक्षाच्या विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यभर पक्षविस्तारासाठी सातत्याने काम केले आहे. २००९ मध्ये भाजप युवा मोर्चाच्या कार्यकारिणी चिटणीसपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. त्यानंतर २०१३ मध्ये युवा मोर्चाचे सरचिटणीस, २०१६ मध्ये युवा मोर्चाचे प्रदेश कोषाध्यक्ष, तर २०२० मध्ये भाजप शहर जिल्हा सरचिटणीस म्हणून त्यांनी काम केले.त्यानंतर २०२३ मध्ये भटके-विमुक्त मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. २०२६ मध्ये प्रदेश सरचिटणीस तथा सहसंयोजक म्हणून त्यांनी भटके-विमुक्त समाजाच्या विविध प्रश्नांसाठी आणि पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी काम केले. आता राज्य समितीवर सहसंयोजक म्हणून झालेली निवड ही त्यांच्या प्रदीर्घ संघटनात्मक कार्याची दखल मानली जात आहे.लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाची भूमिका आणि विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी पोटे यांनी सातत्याने प्रयत्न केले. भटके-विमुक्त समाजातील कार्यकर्ते व नागरिकांशी संपर्क वाढवून त्यांना पक्षाच्या प्रवाहात आणण्यासाठीही त्यांनी संघटनात्मक पातळीवर काम केले आहे. पोटे यांच्या निवडीबद्दल विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगर दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नगर उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, पाथर्डीच्या आमदार मोनिका राजळे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन केले. राज्य समितीवर मिळालेल्या नव्या जबाबदारीच्या माध्यमातून भटके-विमुक्त समाजातील प्रश्नांना पक्षाच्या व्यासपीठावर प्रभावीपणे मांडण्यासोबतच संघटनात्मक विस्ताराला अधिक गती देण्याचा निर्धार तुषार पोटे यांच्या निवडीमुळे व्यक्त होत आहे.

### जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त नेल आर्ट प्रशिक्षण वर्गास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अहिल्यानगर- भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने बागडपट्टी येथील जिव्हेश्वर भवन येथे सर्वांसाठी मोफत नेल आर्ट प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले.या वर्गाला महिलांचा आणि युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, सचिव विजय मानकर, उत्सव समितीचे अध्यक्ष नीरज चांगटे, महेश कांबळे,श्रीमती छाया साळी,सौ.वनिता पाटेकर,सौ. सुरेखा शेकटकर,सौ.दिपाली कांबळे,सौ.माधुरी खडामकर,सौ.अनुजा कांबळे,सौ.वैशाली येवलेकर, सौ.पल्लवी कनोरे, सौ.शुभदा वल्ली,सौ.शैला मानकर, सौ.स्वाती बागडे,सौ.स्नेहा पाठक,श्रीमती अनुराधा मिसाळ,कु.ऋतुजा धोत्रे आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सौ. प्रतिभा सुभाष रत्नपारखी यांचे दु:खद निधन


अहिल्यानगर - अहिल्यानगर येथील रहिवाशी सौ.



प्रतिभा सुभाष रत्नपारखी (वय ६९) यांचे शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्या अत्यंत दानशूर, अत्यंत मनमिळाऊ, प्रेमळ आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. आपल्या वात्सल्यमयी स्वभावाने त्यांनी कुटुंबासह समाजातील प्रत्येकाचे प्रेम मिळवले. त्या सामाजिक कार्यकर्ते अंश रत्नपारखी यांच्या आदरणीय आजी तसेच सुभाष गंगाधर रत्नपारखी यांच्या पत्नी व सचिन रत्नपारखी आणि वैभव रत्नपारखी यांच्या मातृश्री होत्या. त्यांच्या जाण्याने रत्नपारखी कुटुंबाची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे.

### वत्सला लाटे यांचे वृद्धापकाळाने निधन

अहिल्यानगर- सावेडी उपनगरातील गुलमोहर



रोडवरील मॉडर्न कॉलनी येथील रहिवाशी श्रीमती वत्सला लक्ष्मीकांत लाटे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८५ वर्षाच्या होत्या. अहिल्यानगर येथील अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. स्वर्गीय वत्सला लाटे ह्या धार्मिक वृत्ती व मनमिळाऊ स्वभावा च्या होत्या. त्यांच्या मागे २ मुले, सुना, मुलगी,जावई,नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### श्रीकृष्ण नगरला रविवारपासून भगवत गीता ज्ञानयज्ञास प्रारंभ



अहिल्यानगर- श्रावण मासानिमित्त सावेडी उपनगरात पाईपलाईन रोडवरील श्रीकृष्ण नगर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रविवार (दि.२३) पासून श्रीमद भगवत गीता ज्ञानयज्ञ सोहळ्यास प्रारंभ होत आहे. श्रीकृष्ण नगर विठ्ठल रुक्मिणी मंदिर व अहिल्यानगर चिन्मय मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या ज्ञानयज्ञ सप्ताह मधे नांदेड येथील चिन्मय मिशनचे प्रमुख स्वामी प्रत्ययानंद सरस्वती हे १८ वा अध्यायावर प्रवचन देणार आहेत. रोज दुपारी ४ ते ६ या वेळेत हे प्रवचन विठ्ठल रुक्मिणी मंदिरात होणार आहे. तरी भाविकांनी अध्याय १८ वा श्रवणाचा लाभ घ्यावा. असे आवाहन मिशनच्या वतीने हभप विद्याताई हारदे यांनी केले आहे. या ज्ञानयज्ञ सप्ताहात सकाळी ७.३० ते ८.३० रोज एक तास कठोपनिषद विषयावर प्रवचने होणार आहे.याची सर्व भाविकांनी नोंद घ्यावी.

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले सोमवारी अहिल्यानगर दौऱ्यावर

अहिल्यानगर - केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय नेते ना. रामदास आठवले सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. रिपब्लिकन पक्षाचे राज्य सचिव लोकनेते राजाभाऊ कापसे यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी ना. आठवले वाकडी (ता. राहाता) येथे भेट देणार आहेत. या दौऱ्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांनी दिली.ना. रामदास आठवले हे दिल्लीहून विमानाने छत्रपती संभाजीनगर विमानतळावर सकाळी ११ वाजता दाखल होणार आहेत. त्यानंतर श्रीरामपूरमार्गे वाकडी येथे ते दुपारी सुमारे १२ वाजता पोहोचणार आहेत. येथे लोकनेते राजाभाऊ कापसे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन ते सांत्वन करणार आहेत. यानंतर वाकडी येथे सर्वपक्षीयांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शोकसभेला ना. रामदास आठवले उपस्थित राहणार आहेत. यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने लोकनेते राजाभाऊ कापसे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. कापसे यांच्या सामाजिक व राजकीय योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात येणार असल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. दुपारी ३ वाजता ना. रामदास आठवले हे शिर्डी येथे पत्रकार परिषद घेणार आहेत. पत्रकार परिषदेनंतर भोजन करून ते चारचाकी वाहनाने मुंबईकडे रवाना होणार आहेत. त्यामुळे त्यांच्या या जिल्हा दौऱ्याला रिपब्लिकन पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ना. आठवले यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध आघाड्यांचे पदाधिकारी तसेच समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव, राज्य उपाध्यक्ष विजय वाघचौरे, दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, संजय डोळसे तसेच विभागीय अध्यक्ष भीमा बागुल यांनी जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना या दौऱ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. राजाभाऊ कापसे यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी आणि शोकसभेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने वाकडी येथे उपस्थित राहणार आहेत.



# शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलमध्ये शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंतांचा सन्मान

**पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संयुक्त प्रयत्नांतून घडते गुणवत्तेची पिढी शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशाला व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलमध्ये विविध शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी सौ. संध्या गायकवाड यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला संस्थेचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे पाठबळ लाभल्यास शैक्षणिक क्षेत्रात निश्चितपणे मोठे यश संपादन करता येते, याचा प्रत्यय या गौरव सोहळ्यातून आला.

शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलमध्ये विविध शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा शिक्षणाधिकारी सौ. संध्या गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हाईस चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र. धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, विश्वस्त शिवनारायण वर्मा, संतोष पिपाडा, विनोदजी कटारिया, माजी मुख्याध्यापक एल. के. आव्हाड, माजी प्राचार्य के. जी. गावडे, मुख्याध्यापिका सौ. योगिता गांधी, प्राचार्य दत्तात्रय कसबे आदीसह शिक्षक ,विद्यार्थी .पालक मोठया संख्येने उपस्थित होते . .

यावेळी शिक्षणाधिकारी सौ. संध्या गायकवाड म्हणाल्या, ''शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेबरोबरच त्यांच्या अभ्यासातील सातत्य, वेळेचे नियोजन आणि मेहनतीची कसोटी पाहणारी परीक्षा आहे. या परीक्षेत यश मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन. आज मिळालेले यश हे अंतिम ध्येय न मानता भविष्यातील मोठ्या यशाची पहिली पायरी म्हणून विद्यार्थ्यांनी त्याकडे पाहावे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आवडीचे आणि क्षमतेचे क्षेत्र ओळखून त्यानुसार ध्येय निश्चित करावे. अडचणी आल्या तरी खचून न जाता सातत्याने प्रयत्न करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासली पाहिजे. यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीशी त्यांच्या पालकांचे आणि शिक्षकांचे मोठे योगदान असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पालक व शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा.''

त्या पुढे म्हणाल्या, ''आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पाठांतर करून चालणार नाही, तर विषय समजून घेणे, प्रश्नांचा चिकित्सक विचार करणे, वेळेचे योग्य नियोजन करणे आणि आत्मविश्वासाने परीक्षा देणे या बाबींना विशेष महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि इतर अनावश्यक गोष्टींपासून योग्य अंतर ठेवून अभ्यासाला प्राधान्य द्यावे. पालकांनीही मुलांवर केवळ गुणांसाठी दबाव न आणता त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करावे. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता ओळखून त्याला योग्य दिशा दिली, तर अनेक विद्यार्थी भविष्यात विविध क्षेत्रांत उत्तुंग कामगिरी करू शकतात. आज झालेला गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरेल.''

संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा म्हणाले,कि ''विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणे ही संस्थेची सातत्यपूर्ण भूमिका आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामागे त्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे योगदान आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेतील गुणांपुरते मर्यादित न राहता ज्ञान, संस्कार, शिस्त आणि सामाजिक जाणीव यांचा समतोल साधत व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष द्यावे. आज सन्मानित झालेल्या विद्यार्थ्यांनी भविष्यात आपल्या शाळेचे, पालकांचे आणि संस्थेचे नाव उज्ज्वल करावे.''

संस्थेचे व्हाईस चेअरमन दशरथ खोसे म्हणाले की यश मिळाल्यानंतरही विद्यार्थ्यांनी नम्रता कायम ठेवावी आणि सातत्याने नवीन ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव हा केवळ विद्यार्थ्यांचा सन्मान नसून त्यांच्या पालकांच्या आणि शिक्षकांच्या परिश्रमांचाही गौरव असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माध्यमिक विभागाचे प्राचार्य दत्तात्रय कसबे यांनी केले. त्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या यशाचा आढावा घेताना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे आणि पालकांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य राखून भविष्यातही उत्कृष्ट कामगिरी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कुलकर्णी यांनी केले, तर प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. योगिता गांधी यांनी आभार मानले.

या गौरव सोहळ्यास संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हाईस चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र. धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, विश्वस्त शिवनारायण वर्मा, संतोष पिपाडा , विनोद कटारिया, माजी मुख्याध्यापक एल. के. आव्हाड, माजी प्राचार्य के. जी. गावडे, मुख्याध्यापिका सौ. योगिता गांधी, प्राचार्य दत्तात्रय कसबे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, गुणवंत विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी इयता बारावी ,दहावी परीक्षांमधील गुणवंत विद्यार्थी यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला तसेच या सर्व विद्यार्थाना मार्गदर्शन करणारे शिक्षकांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

# शहरात सांस्कृतिक कार्यक्रमातून देशभक्तीचा सोहळा साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशभक्तीच्या सांस्कृतिक कार्यक्रमातून सामाजिक ऐक्य घडून येते. नव्या पिढीला आपल्या जुन्या परंपरा आणि इतिहासाची माहिती मिळते. कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळतो. समाजात बंधुभाव एकात्मता आणि आपुलकी वाढीस लागत असल्याचे प्रतिपादन माय भारत अहिल्यानगरचे जिल्हा समन्वय अधिकारी सत्यजित संतोष यांनी केले.

८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त स्वच्छता पखवाडा अंतर्गत माय भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, उडाण फाउंडेशनच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीवर गीत गायन, नृत्य स्पर्धा आणि महाराष्ट्राची लोकधारा सादरीकरणाचे कार्यक्रम शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात उत्साहात पार पाडले. यावेळी ते बोलत होते. या सोहळ्यास आमदार संग्राम जगताप, आमदार अक्षय कर्डिले, विशेष सरकारी वकील अ‍ॅड. सुरेश लगड, प्रा. डॉ. शंकर अंदानी, जय असोसिएशन ऑफ एनजीओचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अ‍ॅड. महेश शिंदे, प्रा. डॉ. रमेश वाघमारे, अ‍ॅड. अनिता दिघे, शाहीर कान्हू सुंबे, शासनाचा राज्य युवती पुरस्कार विजेत्या जयश्री शिंदे, रजनी ताठे, उडाणच्या अध्यक्षा आरती शिंदे आदी पाहुणे उपस्थित होते.

पुढे सत्यजित संतोष म्हणाले की, मुलांमधील निरागसता जपा. त्यांचे बालपण बहरु द्या. त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत तुलसीमातेला पाणी अर्पण करून सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. शंकर अंदानी लिखित लेक लाडकी या पुस्तकाला उडान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, योग ही प्राचीन भारतीय संस्कृती असून, आज जगभराने योगाचा स्वीकार केला आहे. युनिटी योगाच्या माध्यमातून प्रत्यक्ष योग प्रात्यक्षिक या सोहळ्यात युवकांनी सादर केले. मानवी जीवनासाठी दररोज योग केला पाहिजे. अहिल्यानगर मधील विविध शाळा, महाविद्यालय, अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर गीते, नृत्य व महाराष्ट्राची लोकधारा ८० व्या स्वातंत्र दिनी सादर करून स्वतंत्र्याचा उत्सव चांगल्या प्रकारे साजरा केल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार अक्षय कर्डिले यांनी उडान फाउंडेशन ही संस्था रतडगाव या छोट्याश्या गावातून येऊन जिल्हाभर सामाजिक योगदान देत आहे. ही संस्था सात वर्षापासून महिला, युवक, युवती आणि विद्यार्थ्यांसाठी उल्लेखनीय कार्य करीत आहे. समाजासाठी संस्थेचे कार्य प्रेरणादायी असून, उपस्थितांना त्यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# तत्त्वांशी कधीही तडजोड न करणाऱ्या अटलजींनी देशाला अणुशक्ती संपन्न बनवले

**पत्रकार, कवी आणि पंतप्रधान अशा प्रत्येक भूमिकेत अटलजींसाठी राष्ट्रहित सर्वांत महत्त्वाचे होते**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** धुळीने भरलेल्या वाऱ्यात झेंडे फडकत होते. राजस्थानमधील निंबाहेडा येथील मैदानावर हजारो डोळे एका दिशेने लागले होते. अचानक शांतता भंगली. पांढऱ्या कापडाने झाकलेली एक भव्य मूर्ती हळूहळू सर्वांसमोर येऊ लागली. तब्बल २१ फूट उंचीची अष्टधातूची मूर्ती होती भारतरत्न आणि माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची. मेवाडच्या वीरभूमीवर उभी असलेली ही मूर्ती जणू काळालाच आव्हान देत होती. राजस्थानमध्ये भारतरत्न आणि माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याच्या अनावरणाचा हा प्रसंग त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाची आठवण करून देणारा ठरला. हे केवळ पुतळ्याचे अनावरण नव्हते, तर सत्ता ही अंतिम ध्येय नसून देशसेवा हेच खरे ध्येय आहे, अशा राजकीय परंपरेचा सन्मान होता. त्याच क्षणी अनेकांच्या मनात पोखरणचा तो ऐतिहासिक दिवस आठवला, जेव्हा तत्त्वांशी कधीही तडजोड न करणाऱ्या अटलजींनी भारताला अणुशक्ती संपन्न देश बनवले.

११ आणि १३ मे १९९८ रोजी राजस्थानमधील पोखरण येथे भारताने अणुचाचण्या केल्या. या चाचण्यांचा आवाज संपूर्ण जगाने ऐकला आणि भारत आता आपल्या सुरक्षेबाबतचे निर्णय कोणत्याही बाहेरील दबावाखाली घेणार नाही, हे स्पष्ट झाले. भारतावर आंतरराष्ट्रीय दबाव होता. आर्थिक निर्बंध लादले जाण्याची शक्यताही होती. मात्र अटलजींचा निर्णय स्पष्ट होता देशहित सर्वांत महत्त्वाचे आहे. हा केवळ अणुचाचण्यांचा निर्णय नव्हता, तर भारताच्या आत्मविश्वासाची आणि स्वाभिमानाची घोषणा होती.

अटलजींचे जीवन अनेक भूमिकांनी समृद्ध होते. ते पत्रकार होते. आपल्या लेखणीतून त्यांनी राष्ट्रवादाची भावना मांडली. 'पाञ्चजन्य' आणि 'स्वदेश' यांसारख्या प्रकाशनांच्या माध्यमातून त्यांनी देशभक्तीची भावना जागृत केली. ते कवीही होते. आपल्या शब्दांतून त्यांनी राष्ट्रभक्ती व्यक्त केली. त्यांच्या कविता मनाला स्पर्श करणाऱ्या आणि धैर्य निर्माण करणाऱ्या होत्या. यानंतर ते पंतप्रधान झाले. पंतप्रधानपदाची जबाबदारी सांभाळतानाही त्यांनी देशाची सुरक्षा आणि चांगले प्रशासन यांना प्राधान्य दिले. पत्रकार, कवी आणि पंतप्रधान अशा प्रत्येक भूमिकेत अटलजींसाठी राष्ट्रहित सर्वांत महत्त्वाचे होते. म्हणूनच त्यांना 'अजातशत्रू' म्हटले गेले. त्यांचा कोणीही शत्रू बनू शकला नाही, कारण त्यांच्या प्रत्येक निर्णयात देश सर्वांत आधी होता.

आज मोदी सरकारनेही या महान व्यक्तिमत्त्वाला नव्या उंचीवर नेले आहे. निंबाहेडा येथे भाजप कार्यकर्त्यांनी १ कोटी ५० लाख रुपये खर्च करून अटलजींचा हा भव्य पुतळा उभारला आहे. पोखरण अणुचाचणीची झलक दाखवणाऱ्या व्यासपीठासह उभारलेले हे स्मारक केवळ दगड-मातीची वास्तू नसून अटलजींच्या आठवणींचे जिवंत स्मारक बनले आहे. अटलजींच्या पुण्यतिथीनिमित्त करण्यात आलेला हा सन्मान देशाला आठवण करून देतो की खरे नेते कधीच मरत नाहीत. ते त्यांच्या विचारांमधून आणि कार्यातून पुढच्या अनेक पिढ्यांमध्ये जिवंत राहतात. आणि इथूनच वर्तमान काळातील अमित शाह यांची भूमिका समोर येते. अटलजींनी ज्या भारताची पायाभरणी केली म्हणजेच, सुरक्षित, मजबूत, आत्मनिर्भर आणि विकासाच्या मार्गावर वेगाने पुढे जाणारा भारत त्या भारताला आणखी मजबूत करण्याची जबाबदारी आजच्या पिढीतील नेत्यांच्या खांद्यावर आहे. अमित शाह हे या वारशाचे एक महत्त्वाचे वाहक म्हणून दिसून येतात.

याच कारणामुळे अमित शाह यांच्याकडे केवळ गृहमंत्री म्हणून पाहणे म्हणजे अटलजींच्या राजकीय वारशाचा अर्थ



मर्यादित करणे ठरेल. अटलजींच्या राष्ट्रवादी विचारांना नव्या भारताच्या सुरक्षा, विकास आणि राष्ट्रीय एकतेच्या ध्येयाशी जोडणारे अमित शाह हे एक प्रमुख नेते आहेत. एका सामान्य नागरिकाच्या नजरेतून पाहिले तर हे चित्र आणखी स्पष्ट होते. समोर अटलजींचा एक भव्य पुतळा आहे. मागे पोखरणच्या ऐतिहासिक अणुचाचणीची आठवण आहे. आणि आजचा भारत आपल्या सुरक्षा, सार्वभौमत्व आणि विकासाबाबत अधिक आत्मविश्वासाने पुढे जात आहे.

गर्दीत उभ्या असलेल्या एका सामान्य नागरिकाच्या डोळ्यांत अभिमान दिसत होता. एका महान नेत्याची आठवण इतक्या श्रद्धेने आणि भव्यपणे जपली जात असल्याचे तो पाहत होता. अटलजींच्या तत्त्वांना अमित शाह यांनी आपल्या कार्यशैलीचा आधार बनवले आहे. दबावापुढे न झुकणे, राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देणे आणि विकासाचा लाभ शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवणे हे अटलजींच्या स्वप्नातील भारताचेच चित्र आहे, जे मोदी सरकारमध्ये अमित शाह पुढे नेत आहेत. अमित शाह आजच्या परिस्थितीतही राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रात, दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात, देशाची एकता मजबूत करण्यात आणि शेवटच्या व्यक्तीपर्यंत विकास पोहोचवण्याच्या प्रयत्नांमध्ये तोच दृढनिश्चय पुढे नेत असल्याचे दिसते. सूर्य मावळू लागला होता. अटलजींच्या पुतळ्यावर सोन्यासारखी चमक पसरली होती. गर्दी हळूहळू कमी होत होती, मात्र लोकांच्या मनातील एक संकल्प आणखी मजबूत झाला होता. तत्त्वांशी कधीही तडजोड न करणाऱ्या अटलजींनी भारताला अणुशक्ती संपन्न देश बनवले. आज अमित शाह त्याच तत्त्वांची मशाल घेऊन पुढे जात आहेत. देशातील सामान्य नागरिक पाहत आहे की अटलजींची स्वप्ने आता अपूर्ण राहिलेली नाहीत. ती देशहिताला सर्वोच्च स्थान देत, दृढतेने आणि अभिमानाने पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. भविष्यात जेव्हा इतिहासाची पाने उलटली जातील, तेव्हा निंबाहेडाचा हा दिवस केवळ एका पुतळ्याच्या अनावरणाचा दिवस म्हणून नोंदवला जाणार नाही. एका महान नेत्याचा वारसा पुढच्या नेतृत्वाने पुढे नेला आणि देशाला नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला, अशी नोंदही या दिवसाची राहील. अटलजींचे विचार आणि त्यांचे स्वप्नातील भारत आजही प्रेरणा देत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अमित शाह सुरक्षा, राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय एकतेच्या संकल्पासह हा वारसा पुढे नेत आहेत.

# शाळांभोवती दारूची दुकाने; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** विद्यार्थी देशाची भावी ताकद असून त्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि पोषक शैक्षणिक वातावरण मिळणे ही शासनाची जबाबदारी आहे. मात्र तालुक्यातील अनेक शाळांमध्ये आजही मूलभूत सुविधांचा अभाव असून, काही शाळांच्या परिसरात दारूची दुकाने व अन्य अवैध व्यवसाय सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. काही शाळांमध्ये पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था नसून पावसाळ्यात वर्गखोल्यांमधून पाणी गळत असल्याचे चित्र आहे. काही गावांमध्ये शाळा नसल्याने विद्यार्थ्यांना दुसऱ्या गावात जावे लागते; मात्र रस्ते व नियमित बससेवेअभावी त्यांची गैरसोय होत आहे. काही शाळांच्या लगतून सार्वजनिक नाल्या वाहत असल्याने दुर्गंधी व अस्वच्छतेचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

**विद्यार्थ्यांच्या मार्गावर व्यसनांचे अड्डे?**

शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, वसतिगृहे तसेच कोचिंग क्लासेसकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मार्गावर देशी दारूची दुकाने, बिअर बार आणि अवैध व्यवसाय सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होऊ नये आणि त्यांना व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी शैक्षणिक संस्थांच्या परिसरात अशा व्यवसायांवर कठोर निर्बंध घालण्याची मागणी करण्यात आली आहे.

**शासनाने तातडीने दखल घ्यावी**

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहून शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शैक्षणिक संस्थांच्या परिसरातील अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्वराज्य जनजागृती परिषदेचे विश्वस्त विष्णू ढवळे यांनी केली. या प्रश्नांवर आगामी काळात परिषदेकडून कठोर भूमिका घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# अभ्यास करून आई-वडील व शाळेचे नाव उज्ज्वल करा- कृष्णा बागडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कल्याण रोड येथील संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या ४ विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे माजी खजिनदार कृष्णा बागडे यांच्या हस्ते शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या चार विद्यार्थ्यांना सायकली भेट देण्यात आल्या.विजेत्या विद्यार्थ्यांची नावे मुलिका गवळी, वैष्णवी कवडे,पल्लवी चाबुकस्वार,चिन्मय गवते आहे.


विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव उज्ज्वल करावे

यावेळी मार्गदर्शन करताना कृष्णा बागडे म्हणाले, ''संस्कृती श्रीनिवास कनोरे विद्यालयाची प्रगती कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून आई-वडील व शाळेचे नाव उज्ज्वल करावे.

मान्यवरांची उपस्थिती - या प्रसंगी शालेय शिक्षण समितीचे चेअरमन जितेंद्र लांडगे, व्हाईस चेअरमन सौ.मृणालताई कनोरे, संस्थेचे खजिनदार गजेंद्र सोनवणे,शिक्षण समितीचे सचिव संजय सागांवकर, स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक,सचिन मडके,चंद्रकांत मानकर,किरण डफळ,प्रसाद कांबळे,योगेश पांढरपोटे, राकेश गवते,निलेश मिसाळ,नीरज चांगटे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी - कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना भामरे, बबनभाई शेख, राजेंद्र गर्जे, सुशीलकुमार आंधळे, चंदा कार्ले, वैशाली केदारे, सुरेखा कर्डिले, राणी पवार, अनिता जपकर, विद्या नरसाळे आदींनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंदा कार्ले यांनी केले तर आभार राजेंद्र गर्जे यांनी मानले.







**चांदबिबी महालावर बिबट्याचा थरार!** शुक्रवारी रात्रीच्या अंधारात नागरिकांच्या मोबाईलमध्ये कैद अंगावर शहारे आणणारे दर्शन; चांदबिबी महाल परिसरात बिबट्यांचा वावर असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण.

# 'गोविंदा... गोविंदा'च्या जयघोषात बालाजी-पद्मावती-लक्ष्मी यांना सामुदायिक हळद

**सावेडीतील श्री श्रमिक बालाजी भगवंताचा ३३ वा वार्षिक ब्रह्मोत्सव भक्तिमय वातावरणात; आज श्री व्यंकटेश वरला कल्याणम सोहळा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ''व्यंकटरमणा गोविंदा... गोविंदा...''च्या गजराने सावेडी परिसर दुमदुमून गेला. भक्तिरसात न्हाऊन निघालेल्या वातावरणात श्री श्रमिक बालाजी भगवंताच्या ३३ व्या वार्षिक ब्रह्मोत्सवाला मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. श्री व्यंकटेश वरला कल्याणम अर्थात बालाजी लग्न सोहळ्यानिमित्त भगवान श्री बालाजी, पद्मावती व लक्ष्मी यांना सामुदायिक हळद लावण्याचा मंगलमय सोहळा मोठ्या भक्तिभावाने पार पडला.

हळदीच्या मंगल सोहळ्याने मंदिर परिसरात जणू विवाहाची लगबगच अनुभवास आली. महिला भक्तांच्या उपस्थितीने वातावरणात उत्साह, भक्ती आणि मांगल्याची त्रिवेणी निर्माण झाली होती. यावेळी महापौर ज्योती गाडे, माजी महापौर शिलाताई शिंदे, नगरसेविका आशा डागवाले , सुनिता कुलकर्णी, रेखा दुलम, रेणुका शेराल, रत्ना बल्लाळ, सुरेखा विदये, जयश्री म्याना यांच्यासह श्री श्रमिक बालाजी महिला मंडळाच्या सदस्य व बालाजी महिला भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ब्रह्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात विविध धार्मिक विधींची रेलचेल सुरू आहे. पहाटे सुप्रभातम व मंगलासम, रुद्राभिषेकम, त्यानंतर वास्तुमंडलम पूजन, चतुष्टी योगिनी पूजन, षोडश मातृका पूजन, होमहवन, हरिपाठ व संध्यारती असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. रात्री ह.भ.प. जनार्दन माळवदे महाराज यांच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरण अधिकच रंगले. गुरुदत्त भजनी मंडळाचे भजन कार्यक्रमानेही भाविकांची मने जिंकली.

आज दुपारी ११ वाजता भगवान श्री बालाजींची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. होमहवनाच्या पूर्णाहुतीनंतर दुपारी १ वाजून १८ मिनिटांनी शुभमुहूर्तावर श्री व्यंकटेश वरला कल्याणम (बालाजी लग्न) सोहळा संपन्न होणार आहे. त्यानंतर सामुदायिक सव्वा रुपयात विवाह सोहळे पार पडणार असून महाप्रसादाने या भक्तिमय ब्रह्मोत्सवाची सांगता होईल.

श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्थेच्या वतीने आतापर्यंत सुमारे २१० विवाह लावण्यात आले असून, या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीची अनोखी परंपरा जपली जात आहे.

# कॅन्सरचे वेळेत निदान आणि उपचार हाच आरोग्याचा आधार – विजय संकलेचा

**आनंदऋषी हॉस्पिटलच्या मोफत कॅन्सर तपासणी शिबिरात ११० रुग्णांची तपासणी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिरांच्या उपक्रमांतर्गत भव्य कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, एकूण ११० रुग्णांनी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घेत वैद्यकीय मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन आयोजक स्व. मानकचंदजी संकलेचा व स्व. कमलाबाई संकलेचा यांच्या स्मरणार्थ विजय संकलेचा, साधनाजी संकलेचा, सिद्धार्थ संकलेचा, कियाना संकलेचा, हितार्थ संकलेचा, राजेंद्र संकलेचा, संजय संकलेचा तसेच संकलेचा परिवाराच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी डॉ. अनिकेत शिंदे, डॉ. तुषार मुळे, डॉ. रवींद्र मुथा, डॉ. मितेश कटारिया, डॉ. भक्ती फाळके, डॉ. निखिता जैन, डॉ. मुकुंद उंडे, डॉ वसंत कटारिया, मानकचंद कटारिया,डॉ. आशिष भंडारी, सतीश लोढा, वसंत चोपडा आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना विजय संकलेचा म्हणाले, ''रुग्ण अनेकदा दुःख, चिंता आणि आजारपणाची भीती घेऊन रुग्णालयात येतात; मात्र योग्य निदान, योग्य उपचार आणि डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाल्यानंतर ते इथून आशावादी मनाने बाहेर पडतात. रुग्ण दुःख घेऊन येतात आणि इथून जाताना आनंद घेऊन जातात, हीच आनंदऋषी हॉस्पिटलच्या सेवाभावी कार्याची खरी ओळख आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही रुग्णाची तपासणी किंवा उपचार थांबू नयेत, या उद्देशाने मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.''

ते पुढे म्हणाले, ''कॅन्सरसारख्या गंभीर आजाराबाबत समाजात अजूनही अनेक गैरसमज आहेत. मात्र आजच्या वैद्यकीय क्षेत्रात कॅन्सरचे लवकर निदान झाल्यास अनेक रुग्णांवर प्रभावी उपचार करणे शक्य आहे. त्यामुळे नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसण्याची वाट न पाहता नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी. स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. समाजातील गरजू रुग्णांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि त्यांना मानसिक आधार देणे, हा आमच्या कुटुंबाचा आणि हॉस्पिटलचा सेवाभावी प्रयत्न कायम सुरू राहील.''

डॉ. अनिकेत शिंदे म्हणाले, ''कॅन्सर हा शब्द ऐकल्यानंतर रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मनात भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे; मात्र भीतीपोटी तपासणी टाळणे योग्य नाही. कॅन्सरचे लवकर निदान झाल्यास उपचारांचे परिणाम अधिक चांगले मिळण्याची शक्यता असते. त्यामुळे शरीरात कोणताही असामान्य बदल जाणवल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. नियमित तपासणी, संतुलित आहार, व्यसनांपासून दूर राहणे आणि आरोग्याबाबत जागरूकता या गोष्टी कॅन्सरविरोधातील लढ्यात महत्त्वाच्या आहेत. अशा मोफत शिबिरांमुळे सर्वसामान्यांना तज्ज्ञ वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध होते.''

ते पुढे म्हणाले, ''आरोग्याची समस्या लहान आहे असे गृहीत धरून त्याकडे दुर्लक्ष करू नये. वेळेत तपासणी करून योग्य निदान करून घेणे हा उपचारातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा आहे. नागरिकांनी या सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा.''

यावेळी आनंदऋषी हॉस्पिटलमधील आरोग्यसेवेच्या कार्याची माहिती देताना सांगण्यात आले की, दररोज किमान ८० ते ८५ रुग्णांचे डायलिसिस केले जाते. आतापर्यंत सुमारे सव्वा लाख रुग्णांचे यशस्वी डायलिसिस करण्यात आले असून, गरजू रुग्णांना सातत्याने दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचा हॉस्पिटलचा प्रयत्न सुरू आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारिया म्हणाले, ''श्री आनंदऋषी हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्यसेवा ही केवळ उपचारापुरती मर्यादित न ठेवता समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचविण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. संकलेचा परिवाराचे हॉस्पिटलला तसेच श्री वर्धमान महावीर युनिव्हरसिटीला सातत्याने मोलाचे सहकार्य लाभत आहे. या सहकार्यामुळे विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविणे शक्य होत असून, भविष्यातही अशाच प्रकारे गरजू रुग्णांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.''

शिबिरात उपस्थित तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची विविध तपासणी करून त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांबाबत आवश्यक मार्गदर्शन केले.

**भिंगारच्या सात खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी धाव**

# उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्नेहबंधतर्फे खेळाडूंचा सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** खेळाडूंमध्ये गुणवत्ता आणि जिद्द असेल, तर योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहनाच्या बळावर ते निश्चितच मोठे यश संपादन करू शकतात. भिंगार स्पोर्ट्स क्लबच्या सातही खेळाडूंनी जिल्हास्तरीय स्पर्धेत केलेली कामगिरी अभिमानास्पद असून, राज्यस्तरीय स्पर्धेतही त्यांनी उज्ज्वल यश मिळवावे, यासाठी स्नेहबंध सोशल फौंडेशन सदैव त्यांच्या पाठीशी राहील, असे प्रतिपादन फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

अहिल्यानगर फेडरेशनतर्फे आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत भिंगार स्पोर्ट्स क्लबच्या सात खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. या यशाबद्दल स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

अर्पिता भंडारी हिने १०० मीटर हर्डल्स व १०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक मिळवला. माधवी दिवाण हिने ५ किलोमीटर धावण्यात प्रथम, तर श्रावणी बेरड हिने १०० व २०० मीटर धावण्यात द्वितीय क्रमांक मिळवला. उमेर शेख याने ८० मीटर हर्डल्समध्ये प्रथम क्रमांक पटकावला.

भागश्री जोशी हिने ट्रायथलॉनमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. वरुण परदेशी याने उंच उडी, लांब उडी व ६० मीटर धावण्यात द्वितीय, तर माही परदेशी हिने ६०० मीटर धावण्यात तृतीय क्रमांक मिळवला. या खेळाडूंना मेजर विठ्ठल काळे व राष्ट्रीय खेळाडू शंकर औरंगे यांचे मार्गदर्शन लाभले.

**दिल्लीगेट येथे रंगणार खेळ पैठणीचा**

# भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ, बागडपट्टी, अहिल्यानगर व भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट पटांगण यांच्या संयुक्त विद्यमाने खेळ पैठणीचा – होम मिनिस्टर या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना द्वारकादास शामकुमार (डी.एस. मिल), अहिल्यानगर यांच्यावतीने बक्षीस देण्यात येणार आहे.

बक्षिसाचे स्वरूप

- प्रथम पारितोषिक : रु. ५,१००/- ची पैठणी
- द्वितीय पारितोषिक : रु. ३,१००/- ची पैठणी
- तृतीय पारितोषिक :रु. २,१००/- ची पैठणी

हा कार्यक्रम *शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट रोजी दुपारी ४.३० वाजता दिल्लीगेट पटांगण येथे होणार आहे. तरी सर्व महिलांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक व विश्वस्त संजय सांगावकर यांनी केले आहे.

बक्षीस वितरण व मान्यवर उपस्थिती

या कार्यक्रमाचे पारितोषिक वितरण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, सुनील माहेश्वरी, नगरसेवक अविनाश घुले, उद्योजक गोपाल बजाज, श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त प्रा.माणिकराव विधाते,भागवत सुरवसे आदी मान्यवर प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त २५ ऑगस्ट रोजी शहरातून सवाद्य मिरवणूक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वकुळसाळी हित संवर्धक मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे दिनांक २५ ऑगस्ट रोजी भगवान श्री जिव्हेश्वर उत्सवानिमित्त शहरातून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.भगवान श्री जिव्हेश्वर यांचा पालखी मार्ग भगवान जिव्हेश्वर मंदिर बागडपट्टी, नेता सुभाष चौक ,चितळे रोड,चौपाटी कारंजा, दिल्ली गेट येथून सिद्धी बाग रोड मार्गे नवरंग व्यायाम शाळा, तोफखाना,समारोप भगवान जिव्हेश्वर मंदिर येथे होणार आहे. तसेच महाआरतीनंतर महाप्रसादाची (भंडारा) व्यवस्था करण्यात आली आहे.

भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त पहाटे पाच ते सहा या वेळेत भगवान श्री जिव्हेश्वर मूर्ती महा अभिषेक सौ जयश्री व श्री उमेश कोदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच ६ ते ७ या वेळेत श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त भगवान श्री जिव्हेश्वर ग्रंथ वाचन होईल, सकाळी ९:३० वाजता श्री जिव्हेश्वर भगवान यांच्या पालखीचे पूजन सौ आरती व श्री निरंजन पाठक यांच्या हस्ते होणार आहे.सायंकाळी चार वाजता पालखीची सवाद्य मिरवणूक नगर प्रदक्षिणा संपन्न होईल.

भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त रक्तदान शिबिर, होम मिनिस्टर स्पर्धा, नेत्र तपासणी व संधिवात शिबिर,मोफत नेल आर्ट प्रशिक्षण,मोफत मेकअप प्रशिक्षण, तसेच विविध भजनी मंडळांचा कार्यक्रम आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी समाज बांधवांनी व भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन स्वकुळ हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले आहे.



**वितभर पोटाची खळगी भरण्यासाठी दोरीवरची कसरत , फडवणीस सरकारच्या काळात विद्यार्थी दशेत शाळेत न जाता या लेकरावर आपले व कुटुंबाचे पोट भरण्यासाठी ही वणवण का करावी लागत असावी बर .ही नशीबाची थट्टा म्हणायची का सरकारचा नाकर्तेपणा छाया – केशव कातोरे दैनिक आकर्षण**

# पोखरीपवळदरा विविध विकासकामांचा शुभारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेरनगर विधानसभा मतदारसंघातील पोखरी व पवळदरा परिसरातील विविध विकासकामांचा शुभारंभ पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते नारळ वाढवून करण्यात आला. स्व. गं. भा. कोसाबाई व कै. तुळशीराम मामा शेलार यांच्या स्मरणार्थ मा. परशुराम शेलार मामा, माजी उपसरपंच यांनी स्वखर्चातून ५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून पोखरी येथील विकासकामांना हातभार लावला आहे. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. या निधीतून पवळदरा (पळसवाडी) येथील बंदिस्त गणपती मंदिराकडे जाणारा रस्ता करणे तसेच येडूबाई माता मंदिराचे सुशोभीकरण करणे या कामांना प्रारंभ करण्यात आला. स्थानिक पातळीवर स्वखर्चातून निधी उपलब्ध करून विकासकामांना हातभार लावण्याची ही भूमिका निश्चितच परिसराच्या विकासाला बळ देणारी ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी बोलताना आमदार



काशिनाथ दाते सरांनी पोखरीपवळदरा परिसरातील नागरिकांच्या विविध मागण्या आणि विकासाच्या प्रश्नांची दखल घेत, ही कामे येत्या काळात पूर्णत्वास नेण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले. जनतेच्या गरजा आणि स्थानिक विकासकामांना प्राधान्य देत उपलब्ध निधीच्या माध्यमातून अधिकाधिक प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य राहुल मधे तसेच साहेबराव खंडागळे यांनी परिसरातील विविध मागण्या आमदार दाते सर यांच्यासमोर मांडल्या. कार्यक्रमास माजी उपसरपंच परशुराम मामा शेलार, सामाजिक न्याय अध्यक्ष अशोक खैरे, मा. चेअरमन यादव फरतारे, कुंडलिक वाकळे, अण्णा पवार, बाबुराव आहेर, सोपान फरतरे, महादु पवार, बन्सी करंजेकर, गोविंद पवार, म्हताजी करंजेकर, निलेश पवार, बाळशीराम शिंदे, युवा सहकारी शिवम पवार, डॉ. अविनाश शेलार, चंद्रकांत राजभोज, विनायक शिंदे, विठ्ठल फरतरे, साहेबराव फरतरे, योगेश फरतारे, गणेश फरतरे, राहुल मधे, आनंदा केदार, सत्यवान करंजेकर, सिताराम केदार, विष्णू खैरे, पंडित खैरे, बाबाजी खैरे, युवा नेते सचिन बबन पवार, दत्ता बर्डे, कैलास वाघ, मन्सूर पटेल, अशोक फरतारे, सारंगधर फरतारे, ज्ञानदेव पवार, मा. रंगनाथ पवार, भाऊसाहेब फारतारे, अण्णा दरेकर, गणपत शिंदे, रोहिदास दरेकर, गोवर्धन गायकवाड, गणपत रामू पवार, गणेश पवार, गोपीनाथ खैरे, मच्छिंद्र फरतरे, गोरख फरतारे, संपत आहेर, गणपत मधे, विलास गावडे, तुकाराम मधे, भाऊसाहेब मधे, लक्ष्मण मधे, अर्जुन मधे, पोपट मधे, संजय मधे, शरद भुतांबरे, झुंबर मधे, उंबर पटेल, पोपट कसबे, पोपट वाघ, बबन ढेरे, सूर्यभान खैरे, शिवाजी बर्डे, सर्जेराव शिंदे, गुलाब बर्डे, राजेंद्र भारथारे, कुंडलिक पवार, सुखा पवार, बाळू कांबळे आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

(पान १ वरून)

## जिल्ह्यात निर्भयपणे गुंतवणूक करून रोजगार निर्माण करतील - ना. विखे

जोडणारे केंद्र झाले आहे.रस्ते विकास आणि शिर्डी विमानतळाचा विस्तार होत असून कार्गो हब निर्माण होईल.जिल्ह्यात सेमी कंडक्टरचा प्रकल्प आणण्यासाठी आपला प्रयत्न आहे.जलसंपदा विभागाच्या माध्यमातून उजनी प्रकल्पावर डेटा सेंटर उभारले जाणार आहे.सुमारे ९४हजार कोटी रुपयांची गुंतवणूक राज्य सरकार करीत असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. उद्योग विभागाच्या सहआयुक्त वृषाली सोनी,उद्योग अधिकारी अशोक बेनके,औद्योगिक विकास मंडळाचे क्षेत्रीय अधिकारी गणेश राठोड अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग शहर अध्यक्ष अनिल मोहिते विनायक देशमुख यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.

## राजकीय फायद्यासाठी विद्यार्थी आंदोलनाचा वापर – विखे

चर्चा अत्यंत गंभीर आहे. राहुल गांधी कितीही सहभागी झाले तरी विद्यार्थ्यांना त्यांच्याबद्दल पूर्ण कल्पना आहे, त्यामुळे त्यांचे कोणीही ऐकायला तयार नाही, असेही ते म्हणाले.

**महत्त्वाच्या परीक्षा राज्य सरकारने घ्याव्यात यासाठी प्रस्ताव पाठविणार**

नीट परीक्षेबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांवर बोलताना विखे पाटील म्हणाले की, या संदर्भात मी स्वतः केंद्र सरकारकडे एक वेगळा प्रस्ताव पाठवणार आहे. अशा सर्व महत्त्वाच्या परीक्षा राज्य सरकारनेच घ्याव्यात, अशी मागणी आपण केंद्र सरकारकडे करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**रोहित पवारांना तेवढेच काम आता उरले आहे!** या कार्यक्रमादरम्यान आमदार रोहित पवार यांनी राहुल गांधी यांच्या स्वागताचे बॅनर लावल्याबाबत विचारले असता, विखे पाटलांनी रोहित पवार यांना आता एवढेच काम शिल्लक राहिले आहे,असा खोचक टोला लगावला.

## कोपरगावातून पळवून आणलेल्या अल्पवयीन मुलीची एलसीबीकडून सुटका

की, मुख्य संशयित नूर राजू पठाण (वय १९, रा. आंबेडकरनगर, राहता) याने पीडित मुलीस पळवून आणले असून ते सोलापूर रस्त्यावरील दरेवाडी येथील हरीमळा परिसरात लपले आहेत. या बातमीच्या आधारे पथकाने तात्काळ धाड टाकून पीडित मुलगी व मुख्य आरोपी नूर पठाण यास ताब्यात घेतले. आरोपींकडे अधिक चौकशी केली असता, त्यांना कोपरगावातून पळून येण्यास आणि अहिल्यानगरमध्ये आश्रय देण्यास समीर मनोज सोनगत (वय २२, रा. हरीमळा, दरेवाडी) याने मदत केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी समीर यालाही तात्काळ ताब्यात घेतले. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे, फुरकान शेख, अशोक लिपणे, आजिनाथ पाखरे, रणजीत जाधव, अमृत आढाव, अभिजित आरकल, महिला पोलीस अंमलदार चिमा काळे व किरण ठुबे यांच्या पथकाने केली.

## सारोळे पठार शिवारात जुगार अड्ड्यावर छापा

माहिती मिळाली होती की, सारोळे पठार येथे पत्र्याच्या शेडच्या आडोशाला काही जण पत्यांवर पैसे लावून तिरट नावाचा हार-जितीचा जुगार खेळत आहेत. या बातमीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकला असता, आरोपी जुगार खेळताना रंगेहाथ पकडले गेले. गणेश बाळासाहेब घुले (वय ३१), रमेश हरिभाऊ मोहिते (वय ३८), संतोष रामकृष्ण यशवंत (वय ४७),, किरण लक्ष्मण मोहिते (वय ३७, चौघेही रा.सारोळे पठार) व रामदास भिका घुले (वय ५५, रा. सावरगाव घुले) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या कारवाईत तीन मोटारसायकल, पाच मोबाईल, ५ हजार ८५० रुपये रोकड असा एकूण २ लाख ५ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध घारगाव पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, व उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि बाबासाहेब बोरसे, सफौ नारायण ढोकरे, पोहेकाँ बाबूराव गोडे, पोकाँ प्रमोद गाडेकर, सुभाष बोडखे व चांगदेव नेहे यांच्या पथकाने केली.

## तरुणाला जीवे मारण्याचा प्रयत्न; सहा आरोपी अटकेत

मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पोलिसांनी घटनेची गंभीर दखल घेतली. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आरोपींना तातडीने अटक करण्याचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी आरोपी शिरूर, गोलेगाव आणि ढवळगाव परिसरात असल्याची गोपनीय माहिती मिळवून शोधमोहीम राबवली. या कारवाईत सहा आरोपींना ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये गणेश अशोक जाधव (२१, येवती), मोनू उर्फ परवेज मुनीर मनियार (२३, देवदैठण), पवन सागर भंडारे (२०, पिंपरी कोलंदर), मोनू उर्फ अनिकेत लक्ष्मण धोंगडे (२६, शिरूर), तेजस राजू सुर्वे (२१, गोलेगाव) आणि पंकज झाडू मेश्राम (१८ वर्षे ५ महिने, तरडोबाचीवाडी) यांचा समावेश आहे. या प्रकरणातील दोन अनोळखी आरोपी अद्याप फरार असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे.ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, पोलीस उपनिरीक्षक विजयकुमार कोठावळे, पोलीस हवालदार भाऊसाहेब यमगर, पोलीस नाईक शरद गांगर्डे, तसेच पोलीस कर्मचारी दादासाहेब क्षिरसागर ,विनोद पवार, योगेश भापकर आणि मोबाईल सेलचे पोलीस कर्मचारी राहुल सांगळे यांनी केली.या प्रकरणाचा पुढील तपास बेलवंडी पोलीस ठाणे करीत आहे.